# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## प्रसिध्दी पत्रक

१. उल्हासनगर शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींना महापालिकेमार्फत नोटीस देण्याची कार्यवाही सुरु आहे. ज्या इमारतींची नांवे धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये आहेत अशा सर्व इमारतीमधील रहिवाश्यांना इमारतींची संरचनात्मक तपासणी करुन घेणेकामी नोटीस देण्यात आल्या होत्या. तसेच ज्या इमारतीमधील रहिवाश्यांनी इमारतींचे संरचनात्मक तपासणी करुन घेतली नव्हती अशा इमारतींचे संरचनात्मक परिक्षण तज्ञ संरचनात्मक अभियंता यांचेमार्फत महापालिकेकडून करणेत येत आहे.

२. त्यापैकी काही धोकादायक इमारतींची तपासणी तज्ञ संरचनात्मक अभियंता यांनी पूर्ण केली असून त्यांचे अहवाल सादर केलेले आहेत. त्यानुसार काही इमारती सी-१ (इमारत राहण्यास अयोग्य असल्याने रिकामी करुन निष्कासीत करणे) व सी-२-ए (इमारत रिकामी करुन संरचनात्मक दुरुस्ती करणे) असल्याबाबत संरचनात्मक अभियंता यांनी सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. त्या आधारे अशा इमारतींमध्ये वास्तव्य करुन राहणा-या नागरिकांना इमारती रिकामी करण्यासाठी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांचेमार्फत नोटीस बजावण्यात येत आहेत.

३. एमएमआरडीएने धोकादायक इमारतींमधील बेघर होणा-या रहिवाश्यांसाठी रेंटल हौसिंग स्किमद्वारे प्राप्त होणा-या ३०० सदनिका उल्हासनगर महानगरपालिकेस तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर सदनिका या तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध् करुन देण्यात आलेल्या आहेत. १५० सदनिका टाटा आमंत्रा, भिवंडी व १५० सदनिका ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ॲक्मे, चितळसर मानपाडा येथे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर ३०० सदनिकांचा ताबा महापालिकेस प्राप्त झाला असून धोकादायक इमारतींमधील गरजू/इच्छुक रहिवाश्यांच्या राहण्याची सोय तात्पुरत्या स्वरुपात या ठिकाणी करण्यात येणार आहे.

४. तरी ज्या इमारती तातडीने निष्कासीत करणे आवश्यक आहे व ज्या इमारती दुरुस्तीसाठी रिकाम्या करणे आवश्यक आहे अश्या इमारतींमधील रहिवाश्यांना तात्पुरत्या निवा-याची व्यवस्था व्हावी यासाठी सदर रहिवाश्यांना या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात सदनिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. बाधित होणा-या इच्छुक नागरिकांनी यासाठी संबधित सहायक आयुक्त्, प्रभाग समिती यांना या कामी संपर्क साधावा.

५. सदर कार्यवाहीसाठी विहित नमुन्यातील सदर अर्जाचा व करारनाम्याचा नमुना महापालिकेचे संकेतस्थळ www.umc.gov.in यावर उपलब्ध आहे. तरी सर्व नागरिकांना विनंती आहे की, सी-१, सी-२ ए या प्रवर्गातील नोटीस प्राप्त झालेल्या इमारती तात्काळ रिकाम्या करण्यात याव्यात. सदर इमारतीमधील नागरिकांना निवासाची तात्पुरती आवश्यकता भासत असल्यास त्यांनी संबंधित सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना संपर्क साधावा. त्याचप्रमाणे शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, त्यांनी त्याच्या इमारतींची संरचनात्मक अभियंता यांचेमार्फत नियमित तपासणी करावी. तसेच त्याआधारे इमारतीची दुरुस्ती इत्यादी करुन घ्यावी. जेणेकरुन भविष्यात होणा-या दुर्घटना टाळता येतील.

२६/०७/२१

दिनांक २६ जुलै, २०२१

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (अ.बां.नि.वि.)
उल्हासनगर महानगरपालिका